# मुक्त विद्यापीठाचा सलून व्यवसाय पदविका शिक्षणक्रम

# प्रवेशासाठी २९ फेब्रुवारीपर्यंत अंतिम मुदत

नाशिक :- लाइफ स्टाइलच्या जमान्यात नाभिक व्यवसाय प्रगती आणि समृद्धीकडे वाटचाल करू लागला आहे. या समाजातील तरुणांच्या हाती परंपरेनेच कला आल्याने या व्यवसायात आधुनिकतेबरोबरच सुशिक्षितपणा येण्यासाठी तरुणांनी शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती करावी या उद्देशाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने सलून व्यवसाय व्यवस्थापन शिक्षणक्रम तयार केला असून हा शिक्षणक्रम येत्या जून २०१२ पासून सुरु होणार आहे.

सलून व्यवसाय या क्षेत्रातही प्रगत तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. नाभिक व्यावसायिकांनी स्वतःमध्ये बदल करून प्रगत तंत्रज्ञानाचे शिक्षण घेणे आवश्यक आहे. या शिक्षणक्रमामुळे आपला व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठीही सलून व्यावसायिकांना चांगला उपयोग होऊ शकणार आहे.

जून २०१२ मध्ये सुरु होणाऱ्या या शिक्षणक्रमासाठी किमान १२वी पास किंवा मुक्त विद्यापीठाचा पूर्वतयारी अभ्यासक्रम पास असणे आवश्यक आहे. पूर्वतयारी शिक्षणक्रमाची प्रवेश प्रक्रिया सध्या सुरु असून विद्यार्थ्यांना २९ फेब्रुवारी २०१२ पर्यंत नियमित शुल्क भरून प्रवेश घेता येणार आहे.

नाभिक व्यवसायाला “नवी दिशा” देण्यासाठी नाभिक व्यावसायिकांनी पूर्वतयारी शिक्षणक्रम पूर्ण करून सलून व्यवसाय व्यवस्थापन पदविकेस प्रवेश घ्यावा असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी आपल्या नजीकच्या अभ्यासकेंद्रावर अथवा सलून व्यवसाय व्यवस्थापन अभ्यासक्रम संयोजक विवेक अहिरे यांना ९४०३७७४६७६ या क्रमांकावर संपर्क साधावा.